## ❖ रमाई आवास योजना

### योजनेचा उद्देश

- अनुसूचित जाती आणि नवबौद्ध कुटुंबांना पक्के घर बांधून देण्यासाठी आर्थिक मदत करणे.
- ग्रामिण व शहरी भागातील लोकांना निवारा उपलब्ध करून देणे.

### पात्रतेचे निकष

- अर्जदार अनुसूचित जाती (SC) किंवा नवबौद्ध (New Buddhist) समाजातील असावा.
- अर्जदाराकडे स्वतःचे घर किंवा पक्के घर नसावे.
- अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न निश्चित मर्यादेच्या आत (उदा. 1 लाखांपेक्षा कमी) असावे.
- अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी (Resident of Maharashtra) असावा.

### आवश्यक कागदपत्रे

जातीचा दाखला (Caste Certificate), उत्पन्नाचा दाखला (Income Certificate),

आधार कार्ड (Aadhar Card), . 7/12 उतारा व नमुना 8-अ  व इतर आवश्यक कागदपत्रे.

## ❖ शबरी आवास योजना

योजनेचा उद्देश

आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासी बाह्य क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घराचे 269.00 चौ.चटई क्षेत्र असलेले पक्के घरकुल उपलब्ध करून देणे .फु.

पात्रतेचे निकष

- लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संवर्गातील असावा .
- लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान 15 वर्षांचे असावे.
- लाभार्थ्यांकडे स्वत.ची जमीन असणे आवश्यक राहील:
- लाभार्थ्यांकडे स्वत .चे किंवा कुटुंबियांचे पक्के घर नसावे:
- अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे  .रु - ग्रामीण क्षेत्र (अ -:1.00 लाख

आवश्यक कागदपत्रे

जातीचे प्रमाणपत्र ,. रहिवासी प्रमाणपत्र , 7/12 उतारा व नमुना 8-अ , जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र तहसिलदार यांचेकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला ,  शासन वेळोवेळी विहित करतील अशी कागदपत्रे ,ग्रामसभेचा ठराव

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आवास योजना

## योजनेचा उद्देश

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आवास योजना ही विमुक्त जाती आणि भटक्या जमाती )VJNT) यांच्यासाठी आहे, जी त्यांना घर बांधण्यासाठी आर्थिक मदत आणि स्थिरता मिळवून देण्यास मदत करते.

विमुक्त जाती आणि भटक्या जमाती )VJNT) कुटुंबाचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांना सामाजिक-.आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे

## पात्रतेचे निकष

- लाभार्थी कुटुंब विमुक्त जाती किंवा भटक्या जमातीचे असावे आणि ते उपजीविकेसाठी गावोगावी फिरून काम करतात,
- लाभार्थ्यांकडे स्वत.ची जमीन असणे आवश्यक राहील:
- लाभार्थ्यांकडे स्वत .चे किंवा कुटुंबियांचे पक्के घर नसावे:
- अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे -:अ .रु - ग्रामीण क्षेत्र (1.00 लाख

## आवश्यक कागदपत्रे

जातीचे प्रमाणपत्र ,. रहिवासी प्रमाणपत्र , 7/12 उतारा व नमुना 8-अ , जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र तहसिलदार यांचेकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला , शासन वेळोवेळी विहित करतील अशी कागदपत्रे ,ग्रामसभेचा ठराव

# ❖ पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी योजना

## योजनेचा उद्देश

ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबांना घरकुल बांधण्यासाठी आवश्यक जागा खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत प्रदान करणे.

जागेच्या कमतरतेमुळे घरकुलाचा लाभ घेऊ न शकणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना मदत करणे.

## लाभार्थ्यांची पात्रता:

- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागात वास्तव्यास असावे.
- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) किंवा इतर राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुलासाठी पात्र असावे. आवास प्लस यादीतील प्रतिक्षा यादीत नाव असावे किंवा जिल्हा निवड समितीने शिफारस केलेले असावे.
- वार्षिक उत्पन्न ₹1,00,000 पेक्षा जास्त नसावे.
- स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या मालकीचे पक्के घर नसावे

## अनुदानाची रक्कम:

- घरकुल बांधकामासाठी 500 चौ. फूट जागा खरेदी करण्यासाठी प्रति लाभार्थी ₹1,00,000 पर्यंत अनुदान.

**आवश्यक कागदपत्रे:**

- सातबारा उतारा, मालमत्ता नोंदपत्र.
- ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीतील उतारा.
- जातीचे प्रमाणपत्र.
- आधार कार्ड.
- रेशन कार्ड.
- निवडणूक ओळखपत्र.
- विद्युत बिल.
- मनरेगा जॉब कार्ड.
- आधार लिंक केलेले बचत खात्याचे पासबुक.
-

## अहिल्यादेवी आवास योजना

**योजनेचा उद्देश**

या योजनेचा मुख्य उदेश म्हणजे धनगर समाजातील गरजु कुटुंबांना पक्के घरे उपलब्ध करुन देणे.जेणेकरुन त्यांचे जीवनमान उंचा वेल आणि त्यांना सुरक्षि त निवास मिळेल.

**लाभार्थ्यांची पात्रता:**

लाभार्थी भटक्या जमातीतील क-प्रवर्गातील धनगर समाजातील असावा.

लाभार्थ्यांच्या कुंटुंबातील कोणत्याही सदस्याने यापुर्वी घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

लाभार्थ्यांची यादी जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली असावी.

**आवश्यक कागदपत्रे**

जातीचा दाखला ,उत्पन्नाचा दाखला ,

आधार कार्ड, . 7/12 उतारा व नमुना 8-अ व इतर आवश्यक कागदपत्रे

## प्रधानमंत्री आवास योजना

**योजनेचा उद्देश**

प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) ही भारत सरकारची महत्वाकांक्षी योजना आहे, जी २०१५ मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेचा मुख्य उद्देश २०२२ पर्यंत (आता २०२५ पर्यंत वाढवलेला) प्रत्येक नागरिकाला स्वतःचे घर मिळवून देणे आहे.

**पात्रता निकष**

- गरिबी रेषेखालील कुटुंबे.
- झोपडपट्टीत राहणारी कुटुंबे.
- अनुसूचित जाती/जमाती (SC/ST) कुटुंबे.
- महिला, दिव्यांग, शहीद सैनिकांच्या विधवा, इ. विशेष गट.

# मोदी आवास योजना

## योजनेचा उद्देश

महाराष्ट्र मोदी आवास घरकुल योजना ही महाराष्ट्र शासनाची एक महत्वाकांक्षी योजना आहे, जी इतर मागासवर्गीय (OBC) कुटुंबांना पक्के घर उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवते.

## पात्रता निकष

- OBC प्रवर्गातील नागरिक: लाभार्थी इतर मागासवर्गीय असावा.
- महाराष्ट्रातील 15 वर्षांचे वास्तव्य: लाभार्थ्याचे महाराष्ट्रात किमान 15 वर्षांचे वास्तव्य असावे.
- वार्षिक उत्पन्न ₹1.20 लाखापेक्षा कमी: लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न ₹1.20 लाखापेक्षा कमी असावे.
- घराची मालकी नसावी: लाभार्थ्यांकडे स्वतःचे किंवा कुटुंबीयांचे पक्के घर नसावे.
- जमीन असणे आवश्यक: स्वतःची किंवा शासनाने दिलेली जमीन असावी, किंवा कच्च्या घरावर पक्के घर बांधता येईल.
- आधी कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा: लाभार्थ्याने पूर्वी कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

## आवश्यक कागदपत्रे

- OBC प्रमाणपत्र
- आधार कार्ड
- 7/12 उतारा किंवा मालमत्ता नोंद
- वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र
- बँक पासबुकची झेरॉक्स